असा. क्र. ४५

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, फेब्रुवारी १२, २००३/ माघ २३, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी २००३

**अधिसूचना**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६०२/प्र.क्र. १७७५/२२.—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई ३) च्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) चा खंड (सव्वीस) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या व त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम १७६ चे पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे ह्या पूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते :—

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २००२ असे संबोधण्यात येईल.



Scanned by CamScanner

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील भाग दोनमधील अनुसूचीतील " दोन : जमिनीवरील कराचा दर—" या शीर्षकाखालील कोष्टकाखाली दिलेल्या स्पष्टीकरणातील कलम (५) मधील " जनावरांचे गोठे " या शब्दांऐवजी " जनावरांचे गोठे, कुक्कुटपालन व कुक्कुटपालनाशी निगडित इमारती " हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कुंदा गोसावी,

शासनाच्या उप सचिव.

Scanned by CamScanner

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th February 2003

*NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

No. VPM. 2602/C.R. 1775/22.–In exercise of the powers conferred by clause (xxvi) of sub- section (*2*) of section 176 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, the same having been previously published as required by sub-section (*4*) of the said section 176, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2003.

2. In Part II of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, in the Schedule, below table with heading *" II. Rate of tax on lands "*, in *Explanation,* in clause (v), for the words " Cattle sheds and " the words " Cattle sheds, poultry farms and buildings connected with poultry farming, and " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Scanned by CamScanner